# मधुमक्षिकापालन : शेती उत्पादन वाढीचा नवा मार्ग

डॉ. नेहा दिलीप काळे
सहाय्यक प्राध्यापक (विस्तार शिक्षण विभाग)
डॉ. अतुल मोहनलाल मुराई
प्राचार्य
कु. मयूरी जयसिंग कोंडूसकर
कृषी पदवी विद्यार्थिनी
कृषी महाविद्यालय, अचलोली, महाड

अनादी काळापासून मानव मधाचा अन्न म्हणून व औषधाकरिता उपयोग करित आहे. संघटित पातळीवर नियोजनबद्ध काम, जिद्द आणि चिकाटीचा उत्तम नमुना म्हणजे ही माशी. निसर्गचक्रातील या लहानशा माशीला असे महत्व आहे. शेतकऱ्याला अनेक फायदे करून देणाऱ्या शेतीपूरक व्यवसायामधील मधुमक्षिका पालन हा एक महत्वाचा व्यवसाय आहे. नैसर्गिक मध मिळवण्यासाठी मधमाश्या पाळणे यालाच म्हणतात 'मधुमक्षिकापालन'. या व्यवसायातून मिळणाऱ्या मध, मेण, पराग, प्रोपोलीस, रॉयल जेली व मधमाशांच्या नागीतील विष यासारख्या पदार्थांपासून शेतकऱ्यास भरघोस नफा मिळवता येतो. शेतकऱ्यांना जसा साप आणि गांडूळ शेती व्यवसायात मदत करतात तसा शेतकऱ्यांना अगदी जवळचा मित्र म्हणजे मधुमक्षिका. परागसिंचनाचे कार्य मधमाशांसारख्या किटकांकडून होत असते. शेतीच्या उत्पादनाची वाढ व फळधारणेकरिता मधमाशांसारख्या किटकांची गरज असते.

### मधुमक्षिका पालनासाठी महाराष्ट्रात वापरल्या जाणाऱ्या जाती:

१. देशी: सातेरी
२. विदेशी: एपिस मेलिफेरा

एपिस मेलीफेरा सर्वांत जास्त मध देणारी आणि अंडे देणारी मधमाशी मानली जाते. ही प्रजात खरेदी करणेही फायदेशीर असते.

### मधुमक्षिका पालनासाठी वापरले जाणारे आधुनिक तंत्रज्ञान:

पोपडीत मध, परागसाठा करण्याची जागा व बारा महिने सतत मधमाशांची वंशावळ पालनाकरिता आधुनिक पद्धतीची दोन दालने असलेली लाकडीपेटी तयार केली असून त्या दोन्ही दालनात काढता-घालता येण्याजोग्या चौकटी विशिष्ठ अशा आकाराच्या मधमाशांची पोपड्या बांधण्याकरिता तयार केल्या आहेत. खालच्या मोठ्या दालनात मधमाशांची वंशावळ तयार होत असते. मधाचा हंगाम सुरु झाला की, मधाचे वरचे दालन ठेवले जाते. मधाच्या दालनातील चौकटीत मध भरला की मध चोकाट बाहेर काढून माश्या बाजूला खालच्या दालनात ठेवल्या जातात. मधाने भरलेली चौकट मधयंत्राच्या सहाय्याने फिरवून शुद्ध व परिपक्व झालेला मध काढता येतो. अशा पद्धतीने मध काढल्यास माशीही मरत नाहीत व गृहत्याग करीत नाहीत. शिवाय मधाचा हंगाम असेपर्यंत आठवड्यातून एकदा मध काढला जातो. मध काढून रिकामी झालेली पोपडी पून्हा त्याच दालनात ठेवून मध भरला की काढता येतो. त्यामुळे मधमाशांना नविन पोपडी बांधायची आवश्यकता नसते.

याव्यतिरिक्त या व्यवसायासाठी चाकू, रिमुव्हिंग मशीन आणि मध गोळा करण्यासाठी ड्रमची गरज असते. यानंतर मध काढणाऱ्या मशीनची गरज असते, ज्याची किंमत २५००० ते ३०००० असते. या लघु उद्योगाला साहाय्य म्हणून सरकारकडून आपल्याला २ ते ५ लाख रुपये कर्जही मिळू शकते.





### मधुमक्षिकापालनासाठी लागणारा कालावधी आणि जागा:

मधुमक्षिकापालन करण्यासाठी सर्वोत्तम कालावधी जानेवारी ते मार्च आणि नोव्हेंबर ते फेब्रुवारी असा असतो. ज्या ठिकाणी मधुमक्षिकापालन करायचे आहे, ती जागा अतिशय स्वच्छ व नीटनेटकी असायला हवी. जिथे फुलांची शेती असेल तिथे मधुमक्षिकापालन व्यवसाय बहरतो, कारण मधमाश्या जितक्या फुलांमधून रस शोषतील, तेवढे उत्तम दर्जाचे मध प्राप्त होते. तुम्ही २०० ते ३०० पेट्या ठेवणार असाल, तर तुम्हाला अंदाजे ४००० ते ५००० स्क्वेअर फुट एवढी जागा लागेल.

### मधमाशांपासून मिळणारे उत्पादन:

- मधमाशा पाळण्याच्या एका पेटीची किंमत सुमारे ३५०० रुपये असते. एका पेटीत १० फ्रेम्स असतात. एका फ्रेममध्ये २५० ते ३०० मधमाश्या राहतात. एका फ्रेममधून २०० ग्रॅम मध काढले जाते. याचा अर्थ, एका पेटीतून आपण २ किलो मध काढू शकता. फ्रेम्स रिकाम्या झाल्या की १० ते १५ दिवसांच्या कालावधीत मधमाश्या पुन्हा पेटीतील फ्रेम्स मधाने भरून टाकतात.
- एका महिन्यात एका पेटीतून आपण ४ किलो मध प्राप्त करू शकता. मध मार्केटमध्ये ८० रुपये ते १०० रुपये किलो या हिशेबाने विकू शकता. अशा तऱ्हेने, आपण एका महिन्याला १,१५,००० रुपये किमतीचे मध विकू शकता.
- ५० मध पेटीमधून मिळणारे उत्पन्न:- ५००-६०० किलो/वर्ष.

### मधमाशांपासून मिळणारे फायदे व त्याचा उपयोग:

- आधुनिक पद्धतीने मधमाशापालन व्यवसाय सुरु केल्यास त्या वसाहतीने शेती पिकावर नेऊन ठेवल्यास परागसिंचनामुळे ३५-४० % उत्पन्नात वाढ होऊन मिळते.
- शेतीचा फुलोरा संपला की, जंगल भागात मधमाशांना उपयुक्त असलेली फुलझाडे असतील त्याठिकाणी स्थलांतर केल्यास मधाचे उत्पन्न जास्त मिळते.
- मधमाशांची संख्या वाढल्यास त्या वसाहतीचे विभाजन करून पोपड्या वाढवता येतात.
- मध: मधमाशांनी फुलातून जमा केलेला मकरंद म्हणजेच मध होय. मध हा जंतूनाशक आहे. जखमा, फोड व भाजलेल्या जखमा लवकर भरून निघतात.
- मेण: मधमाश्यांच्या पोपड्यापासून मेण तयार करता येते. त्यापासून मेणबत्ती, ऑइलपेंट असे अनेक पदार्थ तयार करता येतात.
- पराग: पराग म्हणजे मधमाशांनी फुलांवरून जमा केलेल्या परागाचे कण. त्यामध्ये जीवनसत्वे असल्यामुळे ते प्राणीजीवनाच्या वाढीसाठी व आरोग्य चांगले ठेवण्यासाठी त्याचा उपयोग होतो.
- प्रोपोलीस: प्रोपोलीस म्हणजे मधमाशांनी गोळा केलेला झाडावरचा काळसर रंगाचा चिकट पदार्थ असून वसाहतीतील फटी बंद करण्यासाठी त्याचा वापर करतात.
- रॉयल: कामकरी माशा हा पदार्थ तयार करून जेली राणीला पौष्टीक आहार म्हणून भरवतात. त्यामूळे राणी कामकरी माशांपेक्षा दुप्पट मोठी होते व आयुष्य वाढते.

### मधुमक्षिकापालन करताना कोणत्या गोष्टींची दक्षता बाळगावी?

- मधमाश्या विषारी असतात. त्यांनी आपल्याला दंश केल्यास आपल्याला उपचार घ्यावे लागतात.
- मध गोळा करण्यासाठी आपल्याला मधमाशीची जी प्रजाती सांगितली आहे, तीच विकत घ्यावी.
- मधमाश्यांच्या पेट्या स्वच्छ जागेत ठेवाव्यात. कीटकांमुळे त्यांना नुकसान होऊ शकते.
- पाल सारखे भिंतीवर सरपटणारे प्राणी मधमाश्या खाऊन टाकतात. त्यामुळे तुम्हाला अशी जागा विकसित करायची आहे, की जिथे अशा नुकसानकारक प्राण्यांचा उपद्रव होणार नाही.
- कित्येक वेळी मधमाश्या चावल्याने लोकांचा मृत्यू होतो. त्यापासून वाचण्यासाठी उंच बूट, हातांचे रक्षण व्हावे यासाठी ग्लोव्हज व चेहऱ्याचे रक्षण व्हावे यासाठी हेल्मेट आदि गोष्टी वापरणे विसरू नये.
- मधुमक्षिकापालन व्यवसायात खूप स्वच्छता ठेवावी लागते. त्यामुळे खर्च पेलवणे शक्य नसेल तर सुरवातीला कमी पेट्या विकत घेवून व्यवसाय सुरु करा.
- मधमाश्यांसाठी लागणाऱ्या पेट्या तुम्ही एखाद्या कारागिराकडूनही स्वस्तात बनवून घेवू शकता.

(संपर्क: +९१ ८२०८८२६९४२)

★ ★ ★

## हिवाळ्यात खारीक / खजूर खाण्याचे फायदे

थंडीच्या दिवसांमध्ये रोज खारीक खाल्ले पाहिजेत असं म्हटलं जातं. पण ह्या मागचं मोठं कारण म्हणजे खारीक खाण्याचे खुप फायदे आहेत. खारीक मुळे आपल्या शरीराला नेमके कोणते फायदे होतात हे आज आपण पाहणार आहोत.

१. खारीक मध्ये कॅल्शियमचे प्रमाण खूप जास्त असते. त्यामुळे हाड मजबूत होण्यासाठी खूप फायदा होतो.

२. त्याचप्रमाणे खारीक मध्ये लोह सुद्धा मोठ्या प्रमाणात असते. हिमोग्लोबिनची कमतरता भरुन काढण्यासाठी खारीक अतिशय उपयोगी ठरते.

३. एखाद्या वेळी तुम्हाला अचानक थकवा जाणवला तर अशा वेळी दोन ते तीन खारीक खावे. खारीक मध्ये ग्लूकोज अधिक प्रमाणात असल्याने शरीराला एक प्रकारची तरतरी मिळते.

४. चेहऱ्याचे सौंदर्य वाढविण्यासाठी खारीक खूप उपयोगी ठरते. चेहऱ्यावरील आणि त्वचेवरील सुरकुत्या कमी होण्यास मदत होते आणि चेहरा व त्वचा अधिक उजळ होते.

५. खारीक मध्ये जीवनसत्त्वे आणि प्रथिने खूप अधिक प्रमाणात असतात. त्यामुळे बारीक असणाऱ्या व्यक्तींनी रोज चार ते पाच खारीक खाल्ले तर वजन वाढविण्यासाठी मदत होईल.

६. खारीक मध्ये फायबरचं प्रमाण खूप अधिक असतं. त्यामुळे पचन होण्यास अधिक मदत होते. रात्री खारीक पाण्यात भिजवून ठेवावी आणि सकाळी उठल्यावर खावी. त्यामुळे पचनसंस्था चांगल्या प्रकारे कार्य करते.

७. खारीक हा जीवनसत्त्व अ चा उत्तम स्रोत आहे. त्यामुळे दृष्टी उत्तम राखण्यासाठी मदत होते.

८. खारीक कर्करोग पासून बचाव करण्यास उपयोगी ठरते. आतड्याचा कॅन्सर, स्तनाचा कॅन्सर आणि त्याप्रमाणे फुफ्फुसाचा कॅन्सर पासून बचाव करण्यासाठी खारीक उपयोगी ठरते.

९. अर्धांगवायूचा (लकवा) त्रास कमी करण्यासाठी दररोज एक खारीक खावा.

१०. जर तुम्हाला सर्दीचा त्रास असेल तर एक ग्लास दुधामध्ये पाच खारीक, काही काळीमिरी चे दाणे व एक वेलची (इलायची) टाकून हे दूध चांगले उकळून घ्यावे आणि रात्री झोपण्यापूर्वी हे दूध घेतल्याने सर्दीचा त्रास कमी होण्यासाठी मदत होते.